

# हरवलेल्या साबणाचं रहस्य

गीता धर्मराजनना
चित्रे: शुद्धसत्व बसू
आणि चर्वाक दिप्ता



दक्षिणापूर गावचा सरपंच जयंत हा अत्यंत दयाळू होता. लहान मुलांना तर तो खूप आवडायचा. गंमत म्हणजे मोठ्यांना पण आवडायचा तो.


दक्षिणापूर गावातली लोकं आनंदात जगत होती. सगळे जण तब्येतीत आणि खुशीत रहात होते. ते खूप कष्टाळू होते आणि घरातल्यांबरोबर व मित्रांबरोबर धमाल पण करायचे.


पण लवकरच हे सगळं बदलणार होतं. चेंज म्हणजे एकदमच डेंजर चेंज होणार होतं.

दक्षिणापूरहून खूप लांबवर एक गाव होतं. त्याचं नाव जंतूगाव. एकदा त्या गावातून धुळीचे वारे वहायला लागले.

त्या काळ्याकुट्ट रात्री, छोट्याशा चंद्रकोरीच्या प्रकाशात तोबाकाची नावाचा एक राक्षस येरझा–या घालत होता. हात पाठीमागं आणि कपाळावर भल्यामोठ्या आठ्या. सारखं इकडुन तिकडं, तिकडून इकडं.

आणि त्याच्या डोक्यात सारखे वाईट बेत शिजत होते.





"मला आख्ख्या भारतावर राज्य करायचंय!" तो स्वतःवरच गुरगुरला.

"जंतासुरा, मला लवकर एक उपाय सुचव, आक्काच्या आत्ताा! नाहीतर तुझी काय खैर नाही!". तो ओरडला.


जंतासुराची चांगलीच तंतरली. अगदी हाडं खिळखिळी होईपर्यंत तो थरथर कापायला लागला.

पण अगदी दोन मिनिटातच तोबाकाची समोर येऊन काप–या आवाजात तो म्हणाला, "महाराज, माझ्या डोक्यात एक आयडियाची कल्पना आहे."

"बोला बोल" तोबाकाची अधीरतेने म्हणाला.

त्याच क्षणी त्याच्या पुढं कोरोना व्हायरसची सेना थरथरत कापत उभी होती. कोरोना व्हायरसच्या कणांचा आकार अजूनच लहान झाला.

सरतेशेवटी जंतासुराला वाचा फुटली.



“महाराज! आपण व्हायरस काय असतो हे तुम्हाला माहितीच आहे. इतके छोटे की कुणाला दिसू पण शकत नाही. आपण कुठलाही आवाज न करता कोणत्याही माणसाच्या शरीरात घुसू शकतो.

“बरं मग?” तोबाकाचीचा राक्षसी आवाज सगळीकडे घुमला. “तुम्हाला माहितीच आहे, आपला खास दोस्त करोना व्हायरस! किती कष्ट करतोय भारतात आज!

“बरं, पुढं बोल”! तोबाकाची अधीर होऊन डरकावलाच.

“महाराज,” जंतासुर कुजबुजला, “कितीतरी भारतीय लोक हातच धुवत नाहीत ओ.”

“बरं मग?” गुरकावतच तोबाकाची बोलत होता. जंतासुर दुष्टपणे हसला.

“राजाजी, आपला करोना व्हायरस उत्तम काम कधी करतो? जेव्हा लोक साबण आणि पाण्यानं नीट हात धुवत नाहीत तेव्हा. लोकांनी हात धुवूच नयेत. आणि असेच घाणेरडे हात त्यांनी चेह–याला लावावेत. डोळे चोळावेत. नाकातोंडात घालावेत. साबण नाही नी हात धुणं नाही. काय मज्जा येईला नई?”





"आहा!" तोबाकाचीचे डोळे आता चांगलेच चमकत होते. "जर आपण साबणच अदृश्य केला तर? आपली करोना व्हायरसची सेना मानवांवर पूर्ण विजय मिळवेल. आणि मग मी सगळ्या भारताचा राजा झालोच म्हणून समज."

आणि असंच झालं. करोना व्हायरसच्या सेनेनं पूर्ण भारतावर ताबा मिळवायला सुरुवात केली, तो पण आपल्या देशातल्या सर्वात सुखी असलेल्या गावावर, दक्षिणापूरवर, आक्रमण करून!

जेव्हा जयंत आणि गावातल्या बच्चेमंडळींचं खेळून झालं, तेव्हा त्यांना हात धुताच आले नाहीत!

अहो, साबण कुठं होता?

सगळं गाव बाहेर आलं. साबणाला शोध शोध शोधलं. खोकत, शिंकत... खो खो, ख्याक ख्याक,




भान विसरून लोकांनी शोधलं साबण. अगदी ताप, सर्दी, सुर्र–सुर्र वाहणारं नाक सगळं विसरून!





सगळे साबण अचानक

**गायब** झाले होते.

“आहा”, तोबाकाची आपले हात मजेत चोळत म्हणाला, “हे बघा अडाणी लोक. कसे आपणहूनच हा रोग समाजात पसरवत आहेत. बघा कसे खोकत आहेत एकमेकांच्या चेह—यावर.

**शिं**कला बघा तो कसा, रुमाल तोंडावर न धरताच.” काही वेळातच बच्चेकंपनी जयंतच्या घरासमोर उभी ठाकली. ते म्हणाले, “आमचे आई बाबा आजारी पडलेत. सगळेजण आजारी आहेत गावात. आम्हाला प्लीज मदत कर, जयंतदादा”.

दक्षिणापूरमध्ये एक हत्तीण होती. तिचं नाव तमाशा. तीची सगळ्यांबरोबर घट्ट दोस्ती होती. तिनं दुष्ट तोबाकाची आणि त्याच्या व्हायरस सेनेला काम करताना बघितलं होतं. ते काय करत आहेत याची तिला पूर्ण कल्पना होती. आता वेळ झटपट विचार करण्याची होती.





तमाशानं लक्ष्मी आणि तिच्या मित्रमैत्रिणींना विचारलं, “आपण जयंतदादाला एक आयडिया द्यायला हवी. काय करू शकतो आपण?”

लक्ष्मी एकदम शूर मुलगी होती. तसंच ती खूप चांगली पण होती. आणि ती खूप अभ्यास करायची बरं का. दक्षिणापूरमध्ये ती सगळ्यांना आवडायची. तिनं आयडिया लढवली, “आपणच साबण बनवूयात.”

“खूपच सोपं काम आहे साबण बनवायचा म्हणजे. आपल्या शाळेच्या पुस्तकात वाचलंय की आपण.” एक मुलगी म्हणाली.



तमाशा हसून म्हणाली, “म्हणूनच तुम्ही पोरं पोरी आमचे नेते आहात. किती अभ्यास तो.”


थोड्याच वेळात लक्ष्मी आणि तिच्या दोस्तमंडळींनी गावातल्या महिलांना करोना व्हायरस सेनेला कसं नेस्तनाबूत करायचं हे दाखवलं.



आता सगळ्या गावक–यांत उत्साह संचारला होता. सगळ्या गावानं मिळून भरपूर साबणं बनवली. पोतं न् पोतं भरलं. त्याच साबणांनी त्यांनी हात स्वच्छ धुतले. आणि जेव्हा करोना व्हायरसची सेना चालून आली, तेव्हा काय... न धुतलेले, अस्वच्छ हात त्यांना दिसलेच नाहीत. त्यांच्या चक्कीत जाळच झाला.

एका नजरेतच त्यांना कळून चुकलं कि इथं तर सगळेच हात स्वच्छ होते. आता काही त्यांचं खरं नव्हतं. तोबाकाची आणि त्यांनी तिथुन जी काय धुम ठोकली ती पार जगाच्या पलीकडेच. थांबायचं कामच नाही.

**“शाब्बास लक्ष्मी, शाब्बास दक्षिणापूर.” जयंत खुशीत येऊन ओरडला. त्याचा आवाज दाही दिशांत दुमदुमला.**



# घरी स्वत: साबण कसा बनवाल? :

टी. आर विवेक

1. रिठ्याची २० फळं घ्या आणि बिया पूर्णपणे काढून टका.






2. कवच १ (एक) लि. पाण्यात घालून २ (दोन) तास भिजवा.

महत्वाचे: रिठा अगदी मऊ होईपर्यंत शिजवा. प्रेशर कुकर असल्यास तीन शिट्या काढा.

3. कवच मऊ झाल्यानंतर त्याच पाण्यात ३० (तीस) मिनिटे उकळा. लिंबाच्या किंवा संत्र्याच्या सालीही घालू शकता.



4. रिठा थंड झाल्यानंतर मिक्सर मधून काढा. मिक्सर नसल्यास जास्त उकळा आणि थंड झाल्यानंतर कुटा.





5. बारीक केलेले मिश्रण गाळण्याने गाळून घ्या. लागलं तर पाणी घाला. फेस आलेले मिश्रण पूर्णपणे पिळून घ्या (जसा आपण चिंचेचा कोळ काढतो तसा).



6. पिळून निघालेलं द्रव्य बाटलीत भरून ठेवा.


हे मिश्रण एक आठवडाभर तरी टिकते. त्यानंतर थोडा उग्र वास येऊ शकतो पण नंतर ते भांडी किंवा कपडे धुवायला वापरता येऊ शकतो. चांगले टिकण्यासाठी एक लिटर मिश्रणात एक टोपणभर व्हिनेगर टाका. एक बादलीभर कपडे एक बादलीभर कपडे धुण्यासाठी पाच दृ सहा टि स्पून (छोटे चमचे) मिश्रण वापरा. मिश्रणात पाणी घालून ते हॅंडवॉशच्या बाटलीत भरा. हात आणि चेहरा धुवायला उपयोगी आहे.



Source: https://www.easyayurveda.com/2015/08/07/reetha-soapnut-uses-research-side-effects/

## वेगवेगळ्या भाषांमध्ये रिठ्याला काय म्हणतात?

English name- soap nut, Soapnut, Soap Nut, Soapberry, Soap Berry, Washnut, and Wash Nut, South Indian Soapnut, three-leaf soapberry
Hindi name- Ritha, Reetha, Aritha, फेनिल phenil (as it produces froth), रिष्ट risht, रिष्टक rishtak
Kannada name – Antuvala kayi ಅಂಟುವಾಳ ಕಾಯಿ, ನೊರೆಕಾಯಿ norekaayi, ತೊಗಟೆ ಮರ togate mara
Telugu name- Kunkum Chettu, కుంకుడుచెట్టు kunkuduchettu, ఫేనిలము phenilamu
Tamil name- Pannankottai, புனலை punalai, பூந்தி punthi, பூவந்தி puvanti
Manipuri name – কেক্রু Kekru
Malayalam name – ചവക്കായ് cavakkaay, പശക്കൊട്ടമരം pasakkottamaram, ഉറുവഞ്ചി uruvanchi
Bengali name – रीठा Ritha
Oriya, Konkani name – ରୀଠା Ritha
Urdu name – Phenil, ریٹھا Reetha
Gujarati name – અરીઠી arithi, અરીઠો aritho, અરીઠું arithu



## कोरोना व्हायरस

प्रत्येक व्हायरस एक प्रकारचा जंतू असतो. तसाच कोरोना व्हायरसही एक जंतूच आहे.

कोरोना व्हायरस इतका सूक्ष्म असतो कि तो साध्या डोळ्यांनी दिसूच शकत नाही. त्यासाठी तुम्हाला एक शक्तीशाली इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप लागतो.

जेव्हा कोरोना व्हायरस तुमच्या शरीरात जातो, तेव्हा तुम्ही आजारी पडू शकता.

कोरोना व्हायरसमुळं तुम्हाला सर्दी, खोकला, कांजिण्या, गोवर, फ्लू आणि इतरही आजार होऊ शकतात.

## कोरोना व्हायरस माझ्या शरीरात कसा जातो बरं?

- व्हायरस किंवा विषाणू आपलेआपण जात नाही.
- जेव्हा कुणी शिंकतं किंवा खोकतं आणि त्यांच्या थुंकीचे थेंब तुमच्या अंगावर पडतात तेव्हा तो पसरतो.
- किंवा शिंकताना किंवा खोकताना थुंकीचे थेंब हवेत उडतात. तुम्हाला माहिती आहे का की खोकल्यानंतर थुंकीचे थेंब २० –२५ (वीस – पंचवीस) फुट लांब जा√झ ाकतात आणि शिंकल्यानंतर तर ते ३० – ३५ (तीस – पस्तीस) फुट लांब जाऊ शकतात?
- हे थुंकीचे थेंब हवेत १० (दहा) मिनिटं तरंगू शकतात.
- हे थेंब खुर्च्या, टेबलं, दरवाज्याची हॅंडल्स् वर पडू शकतात आणि ते तिथं एका दिवसापेक्षा जास्त काळ कार्यरत राहू शकतात.
- आणि जर तुम्ही तिथं हात लावलात आणि तोच हात तसाच नाकाला, चेह–याला, तोंडाला, किंवा डोळ्याला लावलात तर व्हायरस तुमच्या शरीरात जाऊ शकतो. आणि तुम्ही खूपच आजारी पडू शकता.

## मग मी व्हायरसला कसं रोखू?

**व्हायरसपासून संरक्षण । स्वत:चं संरक्षण**






- गर्दीत जायचं टाळ.
- दिवसातून अनेक वेळा पाणी (शक्यतो कोमट पाणी) आणि साबणानं हात स्वच्छ धू.
- नाकाला, तोंडाला, डोळ्यांना हात लावायचं टाळ.
- खोकताना किंवा शिंकताना तोंडावर रुमाल धर किंवा हात कोप–यात वाकवून तोंडावर धर.
- जर बरं वाटत नसेल तर घरीच रहा. अगदी किरकोळ सर्दी – खोकला किंवा बारीक ताप असला तरीही.
- जर तुला ताप असेल किंवा तुझा खोकला वाढत असेल तर डॉक्टरांची मदत घे.

*photo permissions awaited*

# हात धुणं किती सोपं आणि मजेचं काम आहे:



हात ओले कर – शक्यतो
गरम पाण्यानं

हातांना साबण लाव

२० (वीस) सेकंद हात नीट हळू हळू
चोळ हात चोळताना पूर्ण बाराखडी
म्हण बघू. अ ते दन्य पर्यंत

किंवा हॅपी बर्थ डे ट यु गाणं
दोनदा म्हण (आणि सुरात गायचं
बाबा)

आता नळाच्या किंवा वाहत्या पाण्याखाली
हात स्वच्छ धू ... कोमट पाणी असलं तर
काय बोलायचंच काम नाही.

कोरड्या टॉवेलनं हात
स्वच्छ पुस.

चित्रे: सोनल गुप्ता वासवानी

**गीता धर्मराजनना** लहान मुलांसाठी लिहायला आवडतं. त्यांना साहित्य आणि शिक्षणक्षेत्रातल्या कामासाठी २०१२ मध्ये पद्मश्री पुरस्कार मिळाला. २०१८ चा सोशल आंत्रप्रन्युअर हा बिझनेस स्टॅंडर्ड हा पुरस्कारही त्यांना विभागून मिळाला आहे.

**टि आर विवेक** बंगळुरूस्थित पत्रकार आहेत. ते सध्या कावेरी नदीचे चरित्र असे पुस्तक लिहित आहेत. हे पुस्तक ऍंड प्रकाशनातर्फे प्रकाशित होणार आहे.

**शुद्धसत्त्व बसू** हे नामांकित रेखाचित्रकार, चित्रकार असून ते ऍनिमेशन फिल्म्सही बनवतात.

**चर्बक दिप्ता** हे ऑकस्फर्डचे माजी विद्यार्थी असून त्यांना रेखाटनं करायला, वेगवेगळे खाद्यपदार्थ खायला आणि जग हिंडायला आवडते.

हे पुस्तक शारदा लेडिज युनियन, चेन्नईच्या सिस्टर सुब्बुलक्ष्मी आणि गौरी चिन्नास्वामी यांना सप्रेम समर्पित करत आहोत.

एक अथक कार्यकर्ती आणि शिक्षणक्षेत्रात अग्रणी असलेल्या सिस्टर सुब्बुलक्ष्मी यांनी १९०० च्या दशकात महिला सशक्तीकरण आणि महिला सुधारणेसाठी अनेक प्रयत्न केले. १९१२ मध्ये त्यांनी महिलाहक्कांविषयी सामान्य ग्रुहिणींमध्ये जाग्रुती करण्यासाठी शारदा लेडिज युनियनची स्थापना केली. गौरी चिन्नास्वामी अशाच ग्रुहिणींपैकी एक होत्या.

कथा

प्रथम आव्रत्ती, कथा, २०२०

प्रकाशनाचे हक्क स्वाधीन © कथा, २०२०

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनरूप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी प्रकाशकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे.

मुद्रण, नवी दिल्ली

ISBN ~~978-93-82454-47-2~~

कथा एक पंजीक्रुत, ना नफा स्वयंसेवी संस्था असून तिची स्थापना १९८८ मध्ये केली गेली. कथा शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात काम करते. लहान मुलांमध्ये आणि प्रौढ वाचकांमध्ये वाचनाची गोडी वाढावी हे कथाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मुलांची वाचनाबद्दलची रुची वाढून त्यांचे शालेय वाचन वाढावे, यासाठी कथा १,००,००० पेक्षा जास्त गरीब मुलांसाठी काम करते

ए ३, सर्वोदय एनक्लेव्ह, श्री ओरोबिंदो मार्ग, नवी दिल्ली दृ ११००१७

दूरध्वनीरू ४१४१ ६६००, ४१४१ ६६२४, ४१८२, ९९९८.

ई–मेलः marketing@katha.org . वेबसाइटः www.books.katha.org


भाषांतरः निखिल नारकर


सर्व कथा गीता धर्मराजन लिखित. जिथे नाहित तिथे तसा उल्लेख आहे. © गीता धर्मराजन


पुस्तकांच्या विक्रीमधून मिळालेली १०ः राशी मुलांच्या शिक्षणासाठी कथा शाळेला दिली जाईल. पुस्तकांसाठी लागणा–या कागदाच्या मोबदल्यात कथा नियमित झाडे लावते.


# हरवलेल्या साबणाचं रहस्य

# read other katha books.




**SUPERGIRLS SERIES:**

**STORIES & POEMS**

**Edited By**

**GEETA DHARMARAJAN**

**The Supergirls Play a Trick**
Ready, set, grow... with this amazing book that introduces young readers to the whys and the hows of taking care of their bodies.

**The Supergirls Make a Difference**
Dive right into this book of playful stories and poems to learn the basics of personal hygiene, ways to stay healthy, and much much more!

**The Supergirls Lead the Way**
Is the water you drink clean? How do you find out if it is? What do you do to make water fit for drinking? Read about all the ways that Supergirls ensure their water is safe, and how you can too!

**The Supergirls Find a Solution**
Say YES to good health and NO to Germasura, the deadliest monster of them all, with this simple book that encourages you to think about hygiene.